# कालसुसंगत अध्यापन हवे

## रणजितसिंह डिसले : बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

कोल्हापूर, ता. १७ : जगभर शिक्षणात अनेक बदल होत आहेत. अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती बदलत आहेत. या बदलांना सामोरे जाऊन आपणही सकारात्मक बदल करणे गरजेचे आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मचा उपयोग अध्ययन व अध्यापनात करणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा ग्लोबल टीचर अ‍ॅवॉर्ड विजेते रणजितसिंह डिसले यांनी व्यक्त केली. त्यांना शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले. या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची कार्यक्रमाला ऑनलाईन प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह असा पुरस्कार देऊन डिसले यांना गौरवण्यात आले.



**कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्कार रविवारी रणजितसिंह डिसले यांना प्रदान केला. यावेळी (डावीकडून) प्राचार्य आर. आर. कुंभार, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे आदी.**

### डिसले गुरुजींचा सल्ला...

- शिक्षकांची व्यावसायिक गुणवत्ता वाढवा.
- संस्थांनी टीचर एक्सलन्स सेंटर सुरू करावीत.
- टीचर एक्स्चेंज कार्यक्रम आखले जावेत.
- जगभरातील एज्युकेशन मॉडेलची माहिती शिक्षकांना द्यावी.
- अध्यापनामध्ये डिजिटल साधनांचा वापर वाढवावा.
- 'जग हाच वर्ग' हा दृष्टिकोन बाळगावा.

या वेळी डिसले म्हणाले, ''आज जो अभ्यासक्रम शिकवत आहोत, त्याला सुसंगत रोजगार उपलब्ध नाही. यासाठी माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. अध्ययन ही एक प्रक्रिया आहे. आपल्याला वाटते की आपण मुलांना शिकवतो, पण ती नैसर्गिकपणे शाळेच्या बाहेर अनेक गोष्टी शिकत असतात. ही बाब लक्षात घेऊन अध्यापन केले पाहिजे. आज 'डिजिटल प्लॅटफॉर्म' उपलब्ध आहेत. त्याचा वापर अध्यापनात केला पाहिजे. शिक्षकांच्या व्यावसायिक गुणवत्तेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे प्रश्न, त्यांचा वेगळा दृष्टिकोन समजावून घेणे आवश्यक आहे. परीक्षा पद्धतीही बदल केला गेला पाहिजे. जागतिक स्तरावरील बदल समजून घेऊन अध्यापन, अध्ययन झाले पाहिजे.

यावेळी 'समर्पित गुरुदेव : प्राचार्य अभयकुमार साळुंखे', 'पुत्र अमृताचा व गंध चंदनाचा' या ग्रंथांचे प्रकाशन झाले. त्याबरोबर शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ उपस्थित होते.

### निर्मितीचा ध्यास ठेवा

यावेळी डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, ''सध्याची पिढी हा वेगळा विचार करते. त्यांना अमेरिकेत जाण्यापेक्षा तेथील नावीन्यपूर्ण संकल्पना आपल्या देशात कशा आणता येतील, याचा ध्यास आहे. भविष्यात मायक्रोसॉफ्ट, गुगलसारख्या नामांकित कंपन्या भारतीय तरुण आपल्याच देशात सुरू करतील. यासाठी निर्मितीचा ध्यास विद्यार्थ्यांना नावीन्यांचा ध्यास ठेवला पाहिजे.



शिनोळी : येथे जागेची पाहणी करताना कुलगुरूंसोबत आमदार राजेश पाटील व इतर.

# सीमाभागातील उपकेंद्राच्या जागेची कुलगुरूंकडून पाहणी

प्रतिनिधी
चंदगड

शिनोळी येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांनी सीमाभागात होणाऱ्या उपकेंद्राच्या जागेची पहाणी करत भेट दिली. आमदार राजेश पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

बहुचर्चित शिवाजी विद्यापीठ उपकेंद्रच्या पुढील कार्यालयीन कामकाजाविषयीची कागदपत्रे तसेच जागा पाहण्यासाठी म्हणून विद्यापीठाची टीम प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव नांदेडकर, इंजिनिअरिग विभागाचे सहकुलसचिव कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव तसेच स्वतः कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी भेट देऊन पाहणी केली. डॉ. शिर्के यांची कुलगुरुपदी निवड झाल्यानंतर त्यांनी प्रथमच चंदगड येथे भेट दिली. आमदार राजेश पाटील यांनी त्यांचे स्वागत करून विद्यापीठाकडून शैक्षणिक धोरणाविषयी असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या. कुलगुरूंनी विद्यापीठासाठी निः पक्षीपणे देऊ केलेल्या दहा एकर जागेबद्दल शिनोळीकरांचे आभार व्यक्त केले. यावेळी प्रा. मोरे, तालुका संघाचे संचालक परशराम पाटील, जि. प. सदस्य अरूण सुतार, चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रल्हाद जोशी उपस्थित होते.